MHST030005872024

दाखल दिनांकः – १२.०२.२०२४
नोंदणी दिनांकः – १२.०२.२०२४
निकाल दिनांकः–०६.०८.२०२६

| कालावधी – | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|
| | ०२ | ०५ | २३ |

**सातारा येथील न्यायदंडाधिकारी वर्ग–१, यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी – श्रीमती व्ही.जे. घाडीगांवकर – रावजाडेजा)**

**–: न्यायनिर्णय :–**

**(घोषित दिनांक ०६.०८.२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३७२/२०२४, निशाणी क्र.१९**

**गु.र.नं.४४१/२०२३, पोलीस ठाणे, बोरगांव**

| | |
|---|---|
| फिर्यादीः | महाराष्ट्र राज्य सरकार,<br>द्वारा, पोलीस ठाणे बोरगांव,<br>ता. जि. सातारा |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्रीमती एस.एस.महांगडे |
| आरोपी | **ज्ञानेश्वर यलप्पा पुजारी,**<br>वयः ३७ वर्षे, कामधंदाः ड्रायव्हर,<br>रा. सोरडी, ता. जत, जि. सांगली |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. व्ही.डी.निकम |

## भाग– ब

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २३.०९.२०२३ |
| पहिली खबर दिनांक | २३.०९.२०२३ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | २४.११.२०२३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १०.१०.२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १२.०८.२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०६.०८.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त केले |

## आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ज्ञानेश्वर यलाप्पा पुजारी | फौ.प्र.सं.कलम ४१ (१)(अ) अन्वये नोटीस दिली | १०.१०.२०२४ | भा.दं.सं. कलम २७९ व मोटार वाहन कायदा | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | कलम १८४ अन्वये | | | |

**भाग– क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| श्रेणी | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | रामहरी महादेव हिपरकर | नि.क्र.१२ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा.क्र.२ | रोहित रमेश डिगे | नि.क्र. १३ | फिर्यादी |
| अ.सा.क्र.३ | बबन शंकर शिंदे | नि. क्र. १५ | घटनास्थळ पंच |
| अ.सा.क्र.४ | जितेंद्र बबन इंगुळकर | नि. क्र. १६ | तपासी अधिकारी |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| ब.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## क. कोर्ट साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

## अभियोगपक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणींची यादी

### अ. अभियोग

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | १४ (सा.क्र.२ कडुन शाबीत) | फिर्याद |
| २ | १७ (सा.क्र.४ कडुन शाबीत) | घटनास्थळ पंचनामा |
| ३ | १८ (सा.क्र.४ कडुन शाबीत) | आर.टी.ओ. ला दिलेले पत्र |

### ब. बचाव

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

### क. कोर्ट निशाणी

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | ७ | आरोपीचे निवेदन |
| २ | १८ | आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) अन्वये नोंदविलेला जबाब. |

**ड. मुद्देमाल**

| अनु. क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| – | –– | – |

आरोपी भारतीय दंड संहिता कलम २७९ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्ह्याच्या संपरिक्षेचा सामना करत आहे.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

०२. आरोपीने दिनांक २३.०९.२०२३ रोजी पहाटे ३.४५ वा. चे सुमारास मौजे काशिळ, ता.जि.सातारा गावचे हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ चे सातारा ते कोल्हापूर जाणारे हायवेरोडवर एस.टी.बस.क्र.एम.एच.१४ एच.जी.८४८३ ही भरधाव वेगात, हयगयीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकरपणे चालवून सदर ठिकाणी असले हायवे डायव्हरशनवरील संरक्षक कॉक्रेट ब्लॉकला धडकून सदर कॉक्रिट ब्लॉकवर जावून एस.टी.बसचा अपघात होवून एस.टी. बसचे नुकसानीस कारणीभूत झाला म्हणून आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली.

०३. त्यावरुन बोरगांव पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४४१/२०२३, भा.दं.वि. कलम २७९ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो. हे.कॉ.ब.नं.२३२५, जे.बी.इंगुळकर यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यांनी गुन्ह्याच्या तपासादरम्यान घटनास्थळावर जाऊन दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला,

साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदवुन घेतले. तपासाअंती आरोपीने भारतीय दंड संहिता कलम २७९ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा केलेबाबत सबळ पुरावा आल्याने त्याचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०४. माझे सन्माननीय पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी याचेवर भारतीय दंड संहिता कलम २७९ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये नि.७ कडे अपराधाचा थोडक्यात तपशिल नोंदविला. आरोपीविरुध्द लावण्यात आलेल्या अपराधाचा मजकुर त्यास वाचून दाखविला. आरोपीने गुन्हा नाकबुल करुन खटला चालविण्याची मागणी केली. मला संक्षिप्त स्वरुपात खटला चालविण्याचा अधिकार नसल्याने मी सदरचा खटला समन्स फौजदारी खटल्याप्रमाणे चालविला आहे.

०५. आरोपीचा फौजदारी प्रकिया संहिता कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन निशाणी क्र.१८ कडे नोंदविले आहे. आरोपीने संपूर्ण नकाराचा आणि त्यांच्याविरुद्ध खोटी फिर्याद दिली व अपघात त्यांच्या चुकीने झाला नसल्याचा बचाव घेतला आहे.

०६. खटला निर्णित करणेसाठी माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी कारणमिमांसह पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपीने दिनांक २३.०९.२०२३ रोजी पहाटे ३.४५ वा. चे सुमारास मौजे काशिळ, ता.जि.सातारा गावचे हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ चे | |

| | | |
|---|---|---|
| | सातारा ते कोल्हापूर जाणारे हायवेरोडवर एस.टी.बस.क्र.एम.एच.१४ एच.जी.८४८३ ही भरधाव वेगात, हयगयीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकरपणे चालवून सदर ठिकाणी असले हायवे डायव्हरशनवरील संरक्षक कॉक्रेट ब्लॉकला धडकून सदर कॉक्रिट ब्लॉकवर जावून एस.टी.बसचा अपघात केला आणि त्यायोगे त्याने कलम २७९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला? | नाही |
| २. | अभियोग पक्ष शाबीत करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील एस.टी.बस ही सार्वजनिक ठिकाणी हलगर्जीपणाने व निष्काळजीपणाने चालविली व त्याद्वारे त्यांनी मोटारवाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा केला? | नाही. |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**:– का र ण मि मां सा –:**

०७. आरोपीविरुध्द निश्चित केलेले दोषारोप शाबीत करण्यासाठी अभियोग पक्षाने खालील प्रमाणे एकुण पाच साक्षीदार तपासले आहेत.

| श्रेणी | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | | | वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
| अ.सा.क्र.१ | रामहरी महादेव हिपरकर | नि.क्र.१२ | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा.क्र.२ | रोहित रमेश डिगे | नि.क्र. १३ | फिर्यादी |
| अ.सा.क्र.३ | बबन शंकर शिंदे | नि. क्र. १५ | घटनास्थळ पंच |
| अ.सा.क्र.४ | जितेंद्र बबन इंगुळकर | नि. क्र. १६ | तपासी अधिकारी |

०८.  तसेच तोंडी पुराव्याव्यतिरिक्त अभियोग पक्षाने खालील नमुद कागदोपत्री पुराव्यावर आपली भिस्त ठेवली आहे.

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | १४ (सा.क्र.२ कडुन शाबीत) | फिर्याद |
| २ | १७ (सा.क्र.४ कडुन शाबीत) | घटनास्थळ पंचनामा |
| ३ | १८ (सा.क्र.४ कडुन शाबीत) | आर.टी.ओ. ला दिलेले पत्र |

०९.  याउलट आरोपीने त्याच्या बचावार्थ मौखिक अथवा कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

१०.  अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.एस.महांगडे व आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही.डी.निकम यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला.

**<u>मुद्दे क्र.१ व २ करीता –</u>**

११.  दोन्ही मुद्दे हे एकाच घटनेशी व एकमेकांशी निगडीत असल्याने तथ्यांची व

पुराव्याची पुनःरावृत्ती टाळणेकरीता सदर मुद्यांची कारणमिमांसा मी एकत्रीत देत आहे.

१२. अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे विवेचन करण्यापूर्वी हयगयीचे व निष्काळजीपणाचे कृत्य म्हणजे काय? हे पहाणे उचित होईल. 'बेदरकारपणा' किंवा 'हयगय' याचा अर्थ धोकादायक कृत्य आणि तसे ते आहे याची जाणीव असणे, असे आहे. परंतु, त्यामागे कोणास नुकसान व्हावे असा इरादा नसतो. तथापी अशा बेदरकार व हयगयीपणाच्या कृत्यांच्या परिणामांबद्दल आरोपी बेफिकीर व उदासीन असतो. त्याचप्रमाणे निष्काळजीपणा याचा अर्थ योग्य ती खबरदारी न घेता केलेले कृत्य होय. वास्तविक पाहता कोणतेही कृत्य करत असताना योग्य ती काळजी घेण्याचे, ते कृत्य करणाऱ्या व्यक्तीचे कर्तव्य असते. सार्वजनिक रस्त्यावर वाहन चालवत असताना प्रत्येक वाहन चालकाने योग्य ती दक्षता व काळजी घेवून, त्याचप्रमाणे रस्त्याच्या परिस्थितीचा पूर्णपणे अंदाज घेवून वाहन चालविणे ही त्याच्यावर असलेली मुलभुत जबाबदारी आहे.

१३. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले दोषारोप सिध्द करणेकामी सर्व प्रथम नि.क्र.१२ वर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार रामहरी (अ.सा.क्र.१) यास तपासले. त्याने त्याच्या पुराव्यात सध्या ते मिरज डेपो येथे चालक आणि वाहक म्हणून कर्तव्यावर असल्याचे कथन केले. पुढे त्यांनी सांगितले की, घटनेची नेमकी तारीख त्यांना आठवत नसून त्यादिवशी ते वाहक म्हणून त्यांची बस क्र.एम.एच.१४ एच.एल.८४८३ ही नाशीक ते मिरज चाले होते व त्यावर चालक ज्ञानेश्वर यलप्पा पुजारी हा होता. त्यांची बस पुणे बेंगलोर हायवेला मौजे काशीळच्या पाठीमागे असताना तेथे रस्त्याचे काम चालू असल्याने रस्त्याला डाव्या बाजूला

वळण दिले होते, त्यांची बस उजव्या बाजूच्या पट्टयाला होती व समोरील रस्त्याचे काम चालू असल्याने डाव्या बाजूला दुभाजक ठेवले असल्याचे त्यांनी कथन केले. त्यांची गाडी वळणावर जाण्यासाठी डाव्या बाजूला घ्यायची होती, परंतु पाठीमागून ट्रॅव्हल्सची बस आणि त्यांच्या बस चालकाने ब्रेक मारला परंतु रस्त्यात रेती आणि खडी पडली असल्याने ब्रेक न लागता त्यांची गाडी समोरील दुभाजकाला धडकल्याचे त्यांनी सांगितले. पुढे त्यांनी कथन केले की, त्यानंतर त्यांनी त्यांची बस तेथे उभी केली व त्यातील प्रवाशांना इतर दुस–या बसमध्ये बसवून पाठवून दिले तसेच त्यांच्या बसमधील कोणत्याही प्रवाशाला कोणतीही दुखापत झाली नव्हती. एस.टी. महामंडळाने त्या बस चालकाविरुद्ध सदरची फिर्यादी नोंदवल्याचे त्यांनी कथन केले.

१४. त्यांनी त्यांच्या उलटतपासात घटनेच्या दिवशी नाशिक येथील एक बंद पडलेली गाडीचे काम झाले असून ते आणण्यासाठी त्यांना व आरोपीला पाठविण्यात आले होते, ती गाडी घेऊन ते सातारा डेपो येथे अंदाजे पहाटे ३.०० ते ३.१५ वाजताचे आसपास पोहोचल्याचे कबूल केले. पुढे त्यांनी त्यांचे सरतपासात त्यांची सीट ड्रायव्हरच्या केबिनमध्ये त्याच्या बाजूला असल्याचे व सातारा डेपो येथून निघाल्यावर आरोपीने गाडीचे ब्रेक कमी लागत असून त्याचे काम आपण कराड डेपो येथे करुन घेऊ असे सांगितल्याचे मान्य केले. त्यांची गाडी उजव्या बाजूने जात असताना त्यांच्या डाव्या बाजूला एक टँकर असल्याचे त्यांनी कबूल केले. त्या रस्त्याला वळण दिल्याबाबतचा कोणताही बोर्ड होता किंवा कसे हे त्यांना दिसले नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांची गाडी वेगात नसल्याचे व अचानक दुभाजक लागल्याने व रस्त्यावर खडी पडली असल्याने गाडीचे ब्रेक न लागल्याने ती जागेवर घसरुन

त्या दुभाजकाला धडकल्याचे त्यांनी कबूल केले. त्यात ड्रायव्हरची काही चूक नसल्याचे देखील त्यांनी मान्य केले. पोलीसांना त्यांच्या वरिष्ठांच्या सांगण्याप्रमाणे जबाब दिल्याचे त्यांनी कबूल केले.

१५. पुढे अभियोग पक्षाने नि.क्र.१३ वर फिर्यादी रोहित डिगे (सा.क्र.२) यांना तपासले. त्यांनी त्यांचे सरतपासात कथन केले आहे की, ते सध्या सातारा डेपो येथे वाहतूक निरीक्षक म्हणून कार्यरत आहे व त्यांच्या ड्यूटीमध्ये चालक वाहक यांच्या नियोजित ड्यूटी लावणे, बसस्थानकाचे व्यवस्थापन करणे व सातारा तालुक्याच्या ठिकाण एस.टी.बसेसबाबत होणारे अपघात वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पाहणी करणे व त्याप्रमाणे अहवाल सादर करणे हे आहे. पुढे त्यांनी सांगितले की, दिनांक २३.०९.२०२३ रोजी बस क्रमांक एम.एच.१४ जी.एच.८४८३ हीचा काशीळ, ता.जि.सातारा गावचे हद्दीत, एन.एच.४ हायवे लगत डिव्हायडरचेकाम चालू होते, त्याठिकाणी अपघात झाला होता व अपघाताच्या वेळी त्या वाहनाचे चालक ज्ञानेश्वर यल्लप्पा पुजारी हे असून त्याचे वाहक इपरकर हे होते. पुढे त्यांनी कथन केले की, त्यांच्या बसची पाहणी करण्याकरिता त्यांच्यासोबत त्यांचे सहकारी श्री. डोंगरे हे देखील आले होते. पुढे त्यांनी सांगितले की, घटनास्थळी गेल्यानंतर त्यांनी पाहिले की, बस डिव्हायडरच्या कॉक्रीटच्या ब्लॉकला धडकून पुढे चढावरती जाऊन थांबली होती, त्यामध्ये बसच्या समोरील बाजूची काच, समोरील बाजूचा बंपर व हेडलाईट, प्रवासी बाजूचा दरवाजा असेंबली व स्टेरिंग पाईपचे नुकसान झाले होते तसेच बसमधील प्रवाशांना कोणालाही दुखापत झाली नाही. पुढे त्यांनी त्यानंतर त्यांनी आरोपीविरुद्ध नि.क्र.१४ अन्वये फिर्याद दाखल

केल्याचे कथन केले. तसेच त्याच्यासमक्ष कोणताही पंचनामा झाला नसल्याचे सांगितले.

१६. त्यांनी त्यांच्या उलटतपासात त्यांच्या कामाची वेळ साधारण सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.३० पर्यंतची असते परंतु अपघात झाले किंवा इतर प्रसंगावेळी त्यांना वेळेचे बंधन राहत नसल्याचे कथन केले. अपघात झाले किंवा इतर प्रसंगावेळी त्यांना बोलवणेस लेखी पत्र दिले जात असल्याचे त्यांनी नाकारले. त्यांनी स्वतः अपघात पाहिला नसल्याचे मान्य केले. पोलीसांना तक्रार देतेवेळी त्यांनी "ब्लॉकला धडकून चडावर जाऊन बस थांबली" यापैकी "चढावर जाऊन थांबली" ही बाब सांगितली नसल्याचे कथन केले. त्यांना त्यांचा जबाब वाचून दाखविण्यात आला, त्यात तसा मजकूर का नमूद नाही, याचे कारण त्यांना सांगता येणार नसल्याचे त्यांनी किान केले. त्यांनी घटनास्थळ पाहिले नसल्याचे त्यांनी नाकारले तसेच वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी फिर्याद दाखल केल्याचेदेखील त्यांनी नाकारले.

१७. पुढे अभियोग पक्षाने नि.क्र.१५ वर घटनास्थळ पंच बबन शिंदे (सा.क्र.३) यांना तपासले. सदर सक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याने सदर साक्षीदाराच्या साक्षीतून घटनास्थळ शाबीत होण्याइतपत पुरावा समोर आलेला नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोग पक्षास उपयुक्त ठरलेली नाही.

१८. पुढे अभियोग पक्षाने नि.क्र.१६ वर तपासी अधिकारी पो.हवा. जितेंद्र इंगुळकर, (सा.क्र.४) यांना तपासले. त्यांनी त्यांचे सरतपासात कथन केले आहे की, दिनांक २३/०९/२०२३ रोजी बोरगाव पोलिस ठाणे येथे पोलिस हवालदार या पदावर कार्यरत असताना सदर गुन्हयाचा तपास त्यांच्याकडे वर्ग करतेवेळी ठाणे अंमलदार यांनी फिर्याद दिली

होती. पुढे त्यांनी कथन केले की, फिर्यादीचे अवलोकन करुन दुस–या दिवशी पंचसोबत जावून नि.क्र.१७ अन्वये घटनास्थळाचा पंचनामा केला. पुढे त्यांनी सांगितले की, घटनास्थळ हे फिर्यादीने दाखविले होते, घटनास्थळ हे मौजे काशीळ ता. जि. सातारा याच्या हद्दीत पुणे ते कोल्हापूर जाणा–या हायवे रोडवर तुळशीराम भानुदास जाधव याच्या शेताजवळ होते, घटनास्थळी असलेल्या सिमेंटच्या ब्लॉकला लागून एस.टी.बसचा अपघात झाला असल्याचा तो पंचनामा होता. पुढे त्यांनी कथन केले की, तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे टिपण नोंदविले. त्यानंतर एस.टी. बस यांत्रीक तपासणीकामी पाठविले व त्यानंतर बसचे यांत्रीकी अहवाल हस्तगत केले व दोषारोपपत्रासोबत दाखल केल्याचे त्यांनी सांगितले. पुढे त्यांनी यांत्रीकी अहवाल मिळणेकामी आर.टी.ओ. ला नि.क्र.१८ अन्वये पत्र दिल्याचे कथन केले. त्यानंतर आरोपीला फौ.प्र.सं. कलम ४१ अ अन्वये नोटीस दिली व तपासाअंती असे निष्पन्न झाले की, आरोपीने त्याच्या ताब्यातील एस.टी. बस क्रमांक MH 14 HG 8483 भरधाव वेगात व निष्काळजीपणाने चालवून सदरचा अपघात केल्याचे त्यांनी कथन केले. शेवटी त्यांनी आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळाल्याने दोषारोपपत्र दाखल केल्याचे त्यांनी कथन केले.

१९. तपासी अधिकारी यांनी त्यांच्या उलटतपासात त्यांनी घटनास्थळ पंचनामा पोलिस स्टेशनमध्येच केल्याचे नाकारले. एस.टी.चा त्यांनी कोणताही पंचनामा केला नसल्याचे त्यांनी कथन केले व आरोपीला कलम २०९ अन्वये कोणतीही नोटीस दिली नसल्याचे मान्य केले. त्यांनी घटनेच्या वेळेस एस.टी.मध्ये किती लोक होती याबद्दल कोणतीही चौकशी केली नसल्याचे नाकारले. त्यांनी एस.टी. मधील प्रवासांचे जबाब नोंदवून घेतले नसल्याचे त्यांनी

कबूल केले. त्यांनी आर.टी. ओ. कार्यालयातून यांत्रीकी अहवाल मागिविल्याचे खोटे सांगत असल्याचे व घटनेच्यावेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील एस.टी. बस क्रमांक MH 14 HG 8483 भरधाव वेगात व निष्काळजीपणाने चालवून सदरचा अपघात केला असल्याचे खोटे सांगत असल्याचे तपासी अधिकारी यांनी नाकारले. याव्यतिरिक्त विचारण्यात आलेल्या प्रश्नांना त्यांनी नाकारले आहे.

२०. एकूण साक्षीदारांचा पुरावा पाहिला असता असे दिसून येत आहे की, या प्रकरणात फिर्यादीने दिलेली फिर्याद ही ऐकीव माहितीवरुन दिलेली आहे. अभियोग पक्षाचा महत्त्वाचा साक्षीदार बस वाहक (अ.सा.क्र.१) हा आहे. तो घटनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असून त्याचा पुरावा या ठिकाणी अत्यंत महत्तवाचा ठरतो. त्यामुळे त्याचा पुरावा बारकाईने पाहणे गरजेचे आहे. बसवाहकाचा व तपासी अधिकारी यांचा एकंदरीत पुरावा पाहिला असता, घटनास्थळ हे शाबीत झालेले आहे तसेच घटनेच्या वेळेस बस क्रमांक MH 14 HG 8483 हे आरोपी चालवत होता, ही बाब देखील येथे शाबीत होत आहे. मात्र अभिलेखावर आलेला पुरावा महत्त्वाच्या मुद्दयावर विसंगती दिसून येत आहे. तपासी अधिकारी यांनी त्याच्या पुराव्यात आरोपीने बस भरधाव वेगात चालविल्याचे सांगितले आहे. परंतु, प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने आरोपीने बस वेगात चालविली नसल्याचे सांगितले आहे. तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराच्या जबाबातून घटनास्थळ हे सार्वजनिक रस्ता असल्याचे शाबीत होत आहे. परंतु प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने दुरुस्त झालेली बस घेऊन निघतेवेळी आरोपीने ब्रेक कमी लागत असल्याचे सांगितले असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे अपघातग्रस्त बस मधील तांत्रीक कारणामुळे

देखील अपघात घडला ही शंका नाकारता येऊ शकत नाही. तसेच वाहन चालकाने रस्त्याचे काम चालू असल्याने डायव्हरजनजवळ कोणतेही दिशा सुचक बोर्ड नसल्याचे सांगितले आहे. तद्उपरांत आरोपी गाडी वेगाने चालवत नव्हता तसेच आरोपीने गाडीला अपघातापासून वाचविण्याकरिता ब्रेक मारला होता, परंतु रस्त्यावरील खडीमुळे तसेच तांत्रीक कारणास्तव ब्रेक कमी लागत असल्याने सदर अपघात घडल्याचे समोर आले आहे. अशा परिस्थितीत अपघाताकरिता एकमात्र आरोपीला दोषी धरता येत नाही. प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने रस्त्याची एकूण परिस्थिती लक्षात आणून दिली असता झालेला अपघात हा आरोपीच्या निष्काळजीपणामुळे किंवा हलगर्जीपणामुळे झाला ही बाब कोठेही शाबीत होत नाही. तसेच प्रस्तुत प्रकरणात कोणीही जखमी झाले नसल्याचे साक्षीदारांच्या पुराव्यातून समोर आले आहे. अभियोग पक्षास आरोपीने त्याची गाडी भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालविल्या संदर्भात कोणताही पुरावा अभिलेखावर नाही, परिणामी ही बाब शाबीत करण्यास अभियोग पक्षास अपयश आले आहे.

२१. वरील बाबींचा सारासार विचार करता, आरोपीने दिनांक २३.०९.२०२३ रोजी पहाटे ३.४५ वा. चे सुमारास मौजे काशिळ, ता.जि.सातारा गावचे हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ चे सातारा ते कोल्हापूर जाणारे हायवेरोडवर एस.टी.बस.क्र.एम.एच.१४ एच.जी.८४८३ ही भरधाव वेगात, हयगयीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन बेदरकरपणे चालवून सदर ठिकाणी असले हायवे डायव्हरशनवरील संरक्षक कॉक्रेट ब्लॉकला धडकून सदर कॉक्रिट ब्लॉकवर जावून एस.टी.बसचा अपघात केला तसेच आरोपीने त्याच्या ताब्यातील एस.टी.बस

ही सार्वजनिक ठिकाणी हलगर्जीपणाने व निष्काळजीपणाने चालविली, यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर आणलेला नाही.

२२. एकंदरीत माझे वरील विवेचनावरुन आरोपीने भा.दं.वि. कलम २७९ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला, असे सर्व संशयाच्या पलीकडे जाऊन शाबीत करण्यास अभियोग पक्ष पुर्णतः अपयशी ठरला आहे. सबब, मी मुद्दे क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहेत.

**मुद्दा क्र.३ करीताः–**

२३. मुद्दे क्र.१ व २ बाबत माझे वरील निष्कर्षावरुन आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम २७९ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये लावण्यात आलेले आरोप सर्व संशयाच्या पलीकडे जावून शाबीत करण्याइतपत ठाम व विश्वासदर्शक पुरावा सादर करण्यास अभियोग पक्ष अयशस्वी ठरला आहे. सहाजिकच संशयाचा फायदा आरोपीच्या लाभात जात आहे. सबब, आरोपी त्यास संशयाचा फायदा देवून तो निर्दोष मुक्त होण्यास लायक आहे. सबब, मुद्दा क्र.३ चे उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी **ज्ञानेश्वर यलाप्पा पुजारी**, यास भारतीय दंड संहिता कलम २७९ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वयेच्या शिक्षेस पात्र अपराधांतुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीस असे आदेशित करण्यात येते की, त्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये रक्कम रुपये १५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंधरा हजार मात्र) चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचा जामीन सादर करावा. सदरचे बंधपत्र हे पुढील सहा महिन्यांकरता वैध राहिल.

(निकाल खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला.)

VRUSHALI GHADIGAONKAR
Digitally signed by VRUSHALI GHADIGAONKAR
Date: 2026.08.06 15:43:53 +0530

दिनांक – ०६.०८.२०२६ (श्रीमती व्ही. जे. घडीगांवकर रावजाडेजा)
ठिकाणी – सातारा ४ थे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सातारा.